# * परिशिष्टे *

1. मनोबोध संहिता.
2. मनोबोधातील काही निवडक श्लोक.
3. मनोबोधातील सुभाषिते.
4. समर्थांची कुंडली.
5. समर्थांची वंशावळ.
6. रामदासांची चरित्ररेखा.
7. रामदासांचे हस्ताक्षर व रामदासांनी सांगितलेले व कल्याण–स्वामींनी लिहून घेतलेले काही मनाचे श्लोक
8. संदर्भ ग्रंथ सूची.

# प रि शि ष्टे

## परिशिष्ट पहिले – 'मनोबोध' संहिता.

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमू पंथ आनंत या राघवाचा ।।1।।
मना सज्जना भक्तिपंथेंचि जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।
जनी निंद्य ते सर्व सोडूनी घ्यावे ।
जनी वंद्य तें सर्व भावें करावें ।।2।।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।
पुढें वैखरी राम आधीं वदावा ।
सदाचार हा थोर सोंडू नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ।।3 ।।
मना वासना दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुध्दी नको रे ।
मना धर्मता नीति सोंडू नको हो ।
मना अंतरी सार विचार राहो ।।4 ।।
मना पापसंकल्प सोडूनि घ्यावा ।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ।
मना कल्पना ते नको वीषयांची ।
विकारे घडे हो जनीं सर्व ची ची ।। 5।।
नको रे मना क्रोध हा खेदकरी ।
नको रे मना काम नानाविकारी ।
नको रे मना लोभ हा अंगिकारू ।

नको रे मना मत्सरू दंभभारू ।। 6 ।।

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे । ९८

मना बोलणे नीच सोशीत जावे ।

स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे ।

मनासर्व लोकांसि रे नीववावे ।।7 ।। ९९

देह त्यागिता कीर्ति मागे उरावी ।

मना सज्जना हेची क्रीया धरावी ।

मना चंदनाचेपरी त्वां झिजावें ।

परी अंतरी सज्जना नीववावें ।।8 ।।

नको रे मना द्रव्य तें पुढिलांचे ।

अति स्वार्थबुध्दी न रे पाप सांचे ।

घडे भोगणे पापु तें कर्म खोटे ।

न होतां मनासरिखें दुःख मोठे ।।9।।

सदा सर्वदा प्रीती रामी धरावी ।

दुखाची स्वये सांडि जीवीं करावी ।

देहदुःख तें सूख मानीत जावे ।

विवेकें सदा स्वस्वरूपी भरावें ।।10 ।।

जनी सर्व सुखी असा कोण आहे ।

विचारी मना तूचि शोधूनी पाहे ।

मना त्वांचि रे पुर्वसंचीत केले ।

तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ।। 11 ।।

मना मानसी दुःख आणु नको रे ।

मना सर्वथा शोक चिंता नको रे ।

विवेके देहबुध्दी सोडूनि द्यावी ।

विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ।। 12 ।।

मना सांग पां रावणा काय जालें ।

अकस्मात तें राज्य सर्वे बुडीलें ।

म्हणेनी कुडी वासना सांडि वेगीं।

बळे लागला काळ हा पाठिलागी ।। 13 ।।
जिवा कर्मयोगी जनी जन्म जाला ।
परी सेवटी काळमूखी निमाला ।
महाथोर ते मृत्युपंथेंचि गेले ।
कितीयेक ते जन्मले आणि मेले ।। 14 ।।
मना पाहता सत्य हे मृत्युभूमी ।
जिता बोलती सर्वही जीव मी मी ।
चिरंजीव हे सर्वही मानितात ।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती ।। 15 ।।
मरे येक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढे जात आहे ।
पुरेना जनी लोभ रे क्षोभ त्यातें ।
म्हणोनी जनी मागुता जन्म घेतें ।।16 ।।
मनीं मानवा व्यर्थ चिंता वाहतें ।
अकस्मात होणार होऊनि जातें ।
घडे भोगणें सर्वही कर्मयोगे ।
मतीमंद ते खेद मानी वियोगे ।। 17 ।।
मना राघवेवीण आशा नको रे ।
मना मानवाची नको कीर्ती तू रे ।
जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणें ।
तया वर्णिता सर्वही श्लाघ्यावाणें ।। 18 ।।
मना सर्वथा सत्य सोंडू नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।
मना सत्य ते सत्य वाचे वदावें ।
मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावें ।। 19 ।।
बहु हिंपुटी होइजे मायपोटी ।
नको रे मना यातना तेचि मोठी ।
निरोधे पचे कोंडिले गर्भवासी ।

अधोमुख रे दुःख त्या बालकासी ।।20 ।।

मना वासना चूकवीं येरझारा ।

मना कामना सांडि रे द्रव्यदारा ।

मना यातना थोर हे गर्भवासीं ।

मना सज्जना भेटवी राघवासीं ।। 21 ।।

मना सज्जना हीत माझे करावे ।

रघुनायका दृढ चित्तीं धरावें ।

महाराज तो स्वामी वायुसुताचा ।

जना उध्दरी नाथ लोकत्रयाचा ।।22 ।।

न बोले मना राघवेंवीण कांही ।

जनी बाऊगें बोलता सूख नाहीं ।

घडीने घडी काळ आयुष्य नेतो ।

देहांती तुला कोण सोडूं पहातो ।। 23 ।।

रघुनायकावीण वायां सिणावें ।

जनासारिखे व्यर्थ कां बोसणावे ।

सदा सर्वदा नाम वाचे वसोदे ।

अहंता मनी पापीणी ते नसोंदे ।। 24 ।।

मना वीट मानू नको बोलण्याचा ।

पुढे मागुता राम जोडेल कैचा ।

सुखाची घडी लोटतां सूख आहे ।

पुढे सर्व जाईल कांही न राहे ।। 25 ।।

देहेरक्षणाकारणें यत्न केला ।

परी शेवटी काळ घेऊनी गेला ।

करीं रे मना भक्ती या राघवाची ।

पुढे अंतरी सोडी चिंता भवाची ।। 26 ।।

भवाच्या भये काय भीतोस लंडी ।

धरीरे मना धीर धाकासि सांडी ।

रघुनायकासारिखा स्वामी शीर ।

नूपेक्षा कदा कोपल्या दंडधारी ।। 27 ।।

दिनानाथ हा राम कोदंडधारी ।

पूढे देखता काळ पोटी थरारी ।

मना वाक्य नेमस्त हें सत्य मानी ।

नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ।। 28 ।।

पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे ।

बळे भक्तरीपूशिरी कांबि वाजे ।

पुरी वाहिली सर्व जेणे विमानीं ।

नुपेक्षा कदा राम दासभिमानी ।। 29 ।।

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।

असा सर्व भूमंडळी कोण आहे ।

जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ।

नूपेक्षा कदा राम दासभिमानी ।। 30 ।।

महासंकटी सोडिले देव जेणे ।

प्रतापें बळे आगळा सर्वगूणें ।

जयातें स्मरे शैलजा शूळपाणी ।

नुपेक्षा कदा राम दासभिमानी ।। 31 ।।

अहिल्या शिळा राघवें मुक्त केली ।

पदीं लागता दिव्य होऊनि गेली ।

जया वर्णितां सीणली वेदवाणी ।

नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ।। 33 ।।

वसे मेरू मांदार हे सृष्टिलीला ।

शशी सूर्य तारांगणे मेघमाला ।

चिरंजीव केलें जनी दास दोन्ही ।

नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ।। 33 ।।

उपेक्षा कदा रामरूपीं असेना ।

जिंवा मानवां निश्चयो तो वसेना ।

शिरी भार वाहेन बोले पुराणी ।
नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ॥ 34 ॥
असे हो जया अंतरी भाव जैसा ।
वसे हो तया अंतरी देव तैसा ।
अनन्यास रक्षीतसे चापपाणी ।
नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ॥ 35 ॥
सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।
सुखानंद आनंद कैवल्यादानी ।
नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ॥ 36 ॥
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा ।
उडी घालितो संकटी स्वामी तैसा ।
हरी भक्तिचा घाव गाजे निशाणीं ।
नुपेक्षा कदा राम दासाभिमानी ॥ 37 ॥
मना प्रार्थना तूजला येक आहे ।
रघुराज अंकीत होऊनि राहे ।
अवज्ञ कदा हो यदर्थी न कीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥ 38 ॥
जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणें ।
जयाचेनि योग समाधान बाणे ।
तयालागि हे सर्व चांचल्य दीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥39 ॥
मनापाविजे सर्वही सूख जेथे ।
अती आदरे ठेवीजे लक्ष तेथे ।
विवेके कुडी कल्पना पालरीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ती कीजे ॥40 ॥

बहू हिंडता सौख्य होणार नाहीं ।
सिणावे परी नातुडे हीत काही ।
विचारें बरें अंतरा बोधवीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।। 41 ।।
बहुतापरि हेचि आता धरारे ।
रघूनायका आपुलेसे करावे ।
दिनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।। 42 ।।
मना सज्जना येक जीवीं धरावें ।
जनी आपुलें हीत तूवां करावें ।
रघूनायकावीण बोलों नको हो ।
सदा मानसी तो निजध्यास राहो ।। 43 ।।
मना रे जनी मौन्यमुद्रा धरावी ।
कथा आदरें राघवाची करावी ।
नसे राम ते धाम सोडूनि द्यावें ।
सुखालागि आरण्य सेवीत जावें ।। 44 ।।
जयाचेनि संगे समाधान भंगे ।
अहंता अकस्मात येऊनि लागे ।
तये संगतीची जनी कोंण गोडी ।
जिये संगतीने मती राम सोडी ।। 45 ।।
मना जे घडी राघवेंवीण गेली ।
जनीं आपुली ते तुवा हानि केली ।
रघूनायकावीण तो सीण आहे ।
जनीं दक्ष तो लक्ष लाऊनि पाहे ।। 46 ।।
मनीं लोचनी श्रीहरी तोचि पाहे ।
जनीं जाणता भक्त होऊनि राहे ।
गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा ।

जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 47 ।।
सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्यवाचा ।
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 48 ।।
सदा बोलण्यासारिखें चालताहे ।
अनेकीं सदा येक देवासि पाहे ।
सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्माचा ।। 49 ।।
नसे अंतरी कामकारी विकारी ।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ।
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 50 ।।
मदें मत्सरें साडिंला स्वार्थ बुद्धी ।
प्रपंचिक नाहीं जयातें उपाधी ।
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 51 ।।
क्रमी वेळ जो तत्वचिंनानुवादे ।
न लिपें कदा दंभवादें विवादें ।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 52 ।।
सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।
जगीं धन्य जो दास सर्वोत्तमाचा ।। 53 ।।
सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं ।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।

चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 54 ।।
नसे मानसी नष्ट आशा दुराशा ।
वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा ।
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 55 ।।
दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।
स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ।
तया अंतरी क्रोध संताप कैचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 56 ।।
जगीं होइजे धन्य या रामनामे ।
क्रिया भक्ति उपासना नित्य नेमें ।
उदासीनता तत्वता सार आहे ।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ।। 57 ।।
नको वासना वीषई वृत्तिरुपे ।
पदार्थी जडे कामना पूर्वपापे ।
सदा राम निःकाम चिंतीत जावा ।
मना कल्पनालेश तोहि नसावा ।। 58 ।।
मना कल्पना कल्पितां कल्पकोटी ।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।
मनीं कामना राम नाहीं जयाला ।
अती आदरे प्रीति नाही तयाला ।। 59 ।।
मना राम कल्पतरु कामधेनु ।
निधी सार चिंतामणी काय वानूं ।
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ।
तया साम्यता कायसी कोण आतां ।। 60 ।।
उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहें ।
तया अंतरी सर्वदा तेचिं आहे ।

जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ।
पुढें मागुता शोक जीवीं धरावा ।। 61 ।।
निजध्यास जो सर्व तूटोनि गेला ।
बळे अंतरी शोक संताप ठेला ।
सुखानंद आनंद भेदें बुडाला ।
मनीं निश्चया सर्व खेदे उडाला ।। 62 ।।
घरी कामधेनू पुढे ताक मागे ।
हरीबोध सांडूनि वीवाद लागे ।
करीं सार चिंतामणी काचखंडे ।
तया मागतां देत आहे उदंडे ।। 63 ।।
अती मूढ त्या दृढ बुद्धीअसेना ।
अती काम त्या राम वित्ती वसेना ।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।
अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ।। 64 ।।
नको दैन्यवाणें जिणे भक्तिऊणें ।
अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें ।
धरीरें मनां आदरें प्रीति रामीं ।
नको वासना हेनधामीं विरामी ।। 65 ।।
नव्हे सार संसार हा घोर आहे ।
मना सज्जना सत्य शोधूनि पाहें ।
जनीं वीष खातां पुढे सूख कैचें ।
करी रे मना ध्यान राघवाचें ।। 66 ।।
घनश्याम हा राम लावण्यरुपी ।
महा धीर गंभीर पूर्ण प्रतापी ।
करी संकटी सेवकाचा कुडावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 67 ।।
बळें आगळा राम कोदंडधारी ।

महाकाळ विक्राळ तोही थरारी ।
पुढे मानवा किंकरा कोण केवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 68 ।।
सुखानंदकारी निवारी भयातें ।
जनीं भक्तिभावें भजावें जयातें ।
विविकें त्यजावा अनचार हेवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 69 ।।
सदा रामनामे वदा पूर्णकामें ।
कदा बाधिजेनापदा नित्यनेमें ।
मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 70 ।।
जयाचेनि नामें महादोष जाती ।
जयाचेनि नामें गती पाविजेती ।
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 71 ।।
न वेचे कदा ग्रंथिचे अर्थ काहीं ।
मुखे नाम उच्चारितां कष्ट नाहीं ।
महाघोर संसार शत्रू जिणावा ।
प्रभात मनी राम चिंतीत जावा ।। 72 ।।
देहदंडणेचे महादुःख आहे ।
देहदुःख ते नाम घेता न रहे ।
सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।। 73 ।।
बहुतापरी संकटे साधनाची ।
व्रते दान उद्यापनें ती धनाचीं ।
दिनाचा दयाळू मनी आठवावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।74 ।।

समस्तामध्ये सार साचार आहे ।
कळेना तरी सर्व शोधून पाहे ।
जिवा संशयो वा उगा तो त्यजावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 75 ।।
नव्हे कर्म ना धर्म ना योग कांही ।
नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही ।
म्हणे दास विश्वास नामीं धरावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। 76 ।।
करी काम निःकाम या राघवाचें ।
करी रूप स्वरूप सर्वां जिवांचे
करी छंद निर्द्वंद हे गूण गातां
हरी कीर्तनीं वृत्तिविश्वास होता ।। 77 ।।
अहो ज्या नरा रामविश्वास नाही ।
तया पामरा बाधिजे सर्व कांही ।
महाराज तो स्वामी कैवल्यादाता ।
वृथा वाहणें देहसंसार चिंता ।। 78 ।।
मना पावना भावना राघवाची ।
धरी अंतर सोडि चिंता भवाची ।
भवाची जिवा मानवा भूलि ठेलीं ।
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली ।। 79 ।।
धरा श्रीवरा त्या हरा अंतरातें ।
तरा दुंस्तरा त्या परा सागरातें ।
सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें ।
करा नीकरा त्या खरा मत्सरातें ।। 80 ।।
मना मत्सरें नाम सांडू नको हो ।
अती आदरे हा निजध्यास राहों ।

समस्तामध्ये नान हे सार आहे।
दुजीं तूळणा तूळिताही न साहे ।। 81 ।।
बहू नाम या रामनामी तुळेंना ।
अभाग्या नरा पामरा हें कळेंना ।
विष। औषध घेतले पार्वतीशे ।
जिवा मानवा किंकरा कोण पूसे ।। 82 ।।
जेणे जाळिला काम तो राम ध्यौतो ।
उमेसी अती आदरे गूण गाता ।
बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेंथे ।
परी अंतरी नामविश्वास तेथे ।। 83 ।।
विठोने शिरीं वाहिला देवराणा ।
तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ।
निवाला स्वये तापसी चंद्रमौळी ।
जिंवा सोडवी रान हा अंतकाळी ।। 84 ।।
भजा राम विश्राम योगेश्वरांचा ।
जपू नेमिला नेम गौरीहराचा ।
स्वये नीववी तापसी चंद्रमौळी ।
तुम्हा सोडवी राम हा अंतकाळी ।। 85 ।।
मुखी राम विश्राम तेथेंचि आहे ।
सदानंद आनंद सेऊनि राहे ।
तयावणि तो सीण संदेहकारी ।
निजधाम हें नाम शोकापहारी ।। 86 ।।
मुखी रांम त्या काम बाधू शकेना ।
गुणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना ।
हरी भक्त तो शक्त कामास मारी ।
जगी धन्य तो मारुती ब्रम्हचारी ।। 87 ।।
बहू चांगले नाम या राघवाचें ।
अती साजिरें स्वरूप सोपे फुकाचें ।
करी मूळ निर्मूळ घेता भवाचे ।

__ जिवा मानवां हेचि कैवल्य साचें ।।88 ।।

जनी भोजनी नाम वाचे वदावें।

अती आदरे गद्य घोष म्हणावें ।

हरी चिंतनें अन्न जेवीत जावें ।

तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।। 89 ।।

नये राम वाणी तया थोर हा णी ।

जनी व्यर्थ प्राणी तया नाम काणी ।

हरी नाम हे वेदशास्त्री पुराणीं ।

बहू आगळे बोलिली व्यासवाणी ।। 90 ।।

नको वीट मानू रघुनायकाचा ।

अती आदरें बोलिजे रान वाचा ।

न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा ।

करी घोष त्या जानकीवल्लभाचा ।। 91 ।।

अती आदरे सर्वही नामधोषें।

गिरीकंदरी जाईजे दूर दोषे ।
हरी तिष्ठतू तोषला नामघोषें
विशेषे हरा मानसी रामपीसें ।। 92 ।।

जगीं पाहता देव हा अन्नदाता ।

तया लागली तत्वता सार चिंता ।

तयाचे मुखी नाम घेता फुकाचे ।

मना सांग पा रे तुझें काय वेचे ।। 93 ।।

तिन्ही लोक जाळू शके कोप येतो ।

निवाला हरू तो मुखे नाम घेतां ।

जपे आदरे पार्वती विश्वमाता ।

म्हणोनी म्हणा तेंचि हें नाम आतां ।। 94 ।।

अजामेळ पापी वदे पुत्रकामें ।

तया मुक्ती नारायणाचेनि नामें।

शुकाकारणे कुंटणी राम वाणी ।
मुखे बोलतां ख्याति जाली पुराणी ।।95 ।।
महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळी ।
जपे रामनामावळी नित्यकाळीं ।
पिता पापरूपी तया देखवेना ।
जनी दैत्य तो नाम मुखे म्हणेना ।। 96 ।।
मुखी नाम नाही तया मुक्ति कैची ।
अहंतागुणे यातना ते फुकाची ।
पुढे अंत येईल तो दैन्यवाणा ।
म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ।। 97 ।।
हरीनाम नेमस्त पाषण तारी ।
बहु तारिले मानव देहधारी ।
तया रामनामी सदा जो विकल्पी ।
वदेना कदा जीव तो पापरूपी ।।98 ।।
जगी धन्य वाराणसी पुण्यराशी ।
तयेमाजिं जात गती पूर्वजासी ।
मुखे रामनामावळी नित्यकाळी ।
जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ।। 99 ।।
यथासांग रे कर्म तेही घडेना ।
घडे कर्म ते पुण्य गाठी पडेना ।
दया पाहतां सर्वभूती असेना ।
फुकाचें मुखी नाम तेंही वसेना ।। 100 ।।
जया नावडे नाम येंम जाची ।
विवल्पे उठे तर्क त्या नर्क ची ची ।
म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे ।
मुखें बोलता दोष जाती स्वभावे ।। 101 ।।
अती लीनता सर्व भावे स्वभावे ।
जना सज्जनालागि संतोषवावे ।
देहेकारणी सर्व लावत जावें ।

सगूण अती आदरेंसी भजावें ।। 102 ।।

हरी कीर्तने प्रीती रामी धरावी ।

देहेबुध्दी नीरूपणी वीसरावी ।

परद्रव्य आणीक कांत परावी ।

यदर्थी मना सांडि जीवी करावी ।।103 ।।

क्रियेविण नानापरी बोलिजेतों ।

परी चित्त दुश्चीत ते लाजवीते ।

मना कल्पना धीर सैराट धावे ।

तया मानवा देव कैसेनि पावे ।। 104 ।।

विवेके क्रिया आपुली पालटावी ।

अती आदरे शुध्द क्रीया धरावी ।

जनी बोलण्यासारिखे चालबाप ।

मना कल्पना सोडि संसारताप

बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा ।

विवेंक मना आवरी स्थानभ्रष्ठा ।

दया सर्वभूती जया मानवाला ।

सदा प्रेमळ भक्तिभावे निवाला ।। 106 ।।

मना कोपे आरोपणा ते नसावी ।

मना बुध्दी हे साधुसंगी बसावी ।

मना नष्ट चांडाळतो संग त्यागी ।

मना होई रे मोक्षभागी विभागी ।।107 ।।

सदा सर्वदा सज्जनाचेही योगे ।

क्रिया पालटे भक्ति भावार्थ लागे ।

क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।

तुटे वाद संवाद तो हीतकारी ।। 108 ।।

जनी वादवेवाद सोडूनि द्यावा।

जनी सुखसेवाद सूखे करावा ।

जगी तोचि तो शोकसंतापहारी ।

तुटे वाद संवाद तो हीतकारी ।। 109 ।।
तुटे वाद संवाद त्याते म्हणावें ।
विवेके अहंभाव याते जिणावें ।
अहंतागुणे वाद नानाविकारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।। 110 ।।
हिताकारणें बोलणे सत्य आहे ।
हिताकारणे सर्व शोधूनि पाहें ।
हितकारणे बंड पाखांड बारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।। 111 ।।
जनी सांगता ऐकता जन्म गेली ।
परी वाद – वेवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभधारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।। 112 ।।
जनी हीत पंडीत सांडीत गेले ।
अहंतागुणे ब्रह्मराक्षस जाले ।
तयाहून व्युत्पन्न तो कोण आहे।
मना सर्व जाणीव सांडून राहे ।। 113 ।।
फुकाचे मुखी बोलता काय वेंचे ।
दिसेंदिस अभ्यंतरी गर्व सांचे ।
क्रियेवीणा वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारे तुझा तूचि शोधून पाहे ।। 114 ।।
तुटे वाद संवाद तेथे करावा ।
विवेकें अहंभाव हा पालटावा ।
जनी बोलण्यासारिखे आचरावें ।
क्रियापालटें भक्तिपंथेचि जावें ।। 115 ।।
बहू श्रापितां कष्टला अंबऋषी।
तयाचे स्वये श्रीहरी जन्म सोशी ।
दिल्हा क्षीरसिंधू तया उपमानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 116 ।।

धुरु लेंकरुं बापुडें दैन्यवाणें ।
कृपा भाकितां दीधली भेटि जेणें ।
चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 117 ।।
गजेंदू महासंकटी वास पाहे ।
तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।
उडी घातली जाहला जीवदानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 118 ।।
अजामेळपापी तया अंत आला ।
कृपाळूपणें तो जनी मुक्त केला ।
अनाथासि आधार हा चक्रपाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 119 ।।
विधीकारणें जाहला मत्स्त्य वेगी ।
धरी कूर्मरुपे धरा पृष्ठभागी ।
जना रक्षणाकारणें नीच योनी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 120 ।।
महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला ।
म्हणोनी तयाकारणें सिंह्र जाला ।
नये ज्वाळ वीषाळ सन्नीध कोव्ही ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 121 ।।
कृपा भाकिता जाहला वज्रपाणी ।
तयाकारणें वामनु चक्रपाणी ।
द्विजाकारणें भार्गव चापपाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 122 ।।
अहिल्ये सतीलागी आरण्यपंथे ।
कुढावा पुढें देव बंदी तयातें ।
बळें सोडितां घाव घाली निशाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।। 123 ।।

तये द्रौपदी कारणें लागवेंगें ।
त्वरें धांवतू सर्व सांडूनि मागें ।
कळीलागि जाला असे बौद्ध मौनी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 124 ।।
अनाथां दिनांकारणें जन्मताहे ।
कलंकी पुढें देव होणार आहे ।
जया वर्णितां सीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। 125 ।।
जनाकारणें देव लीलावतारी ।
बहूतापरीं आदरें वेषधारी ।
तया नेणती ते जन पापरुपी ।
दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ।। 126 ।।
जगीं धन्य तो रामसूखें निवाला ।
कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला ।
देहेभावना रामबोधें उडाली ।
मनोवासना रामरुपीं बुडाली ।। 127 ।।
मना वासना वासुदेवीं वसों दे ।
मना कामना कामसंगी नसो दे ।
मना कल्पना वाउगी ते न कीजे ।
मना सज्जना सज्जनीं वसित कीजे ।। 128 ।।
गतीकारणें संगती सज्जनाची ।
मती पालटे सूमती दुर्जनाची ।
रतीनायिकेंचा पती नष्ट आहे ।
म्हणोनी मनातीत होऊनि राहे ।। 128 ।।
मना अल्पसंकल्प तो ही नसावा ।
सदा सत्यसंकल्प चित्ती वसावा ।
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा ।
रमाकांत एकांतकाळी भजावा ।। 130 ।।

भजाया जनीं पाहतां राम येंकू ।
करी बाण येंकू मुखी शब्द येंकू ।
क्रिया पाहता उध्दरे सर्व लोकू ।
धरा जानकिना, यकाचा विवेकू ।। 131 ।।
विचारूनि बोले विवंचूनि चाले ।
तयाचेनि संतप्त तेही निवाले ।
बरे शोधल्यावीण बोलों नको हो ।
जनी चालणें शुध्द नेमस्त राहो ।। 132 ।।
हरीभक्त वीरक्त विज्ञानराशी ।
जेणे मानसी स्थापिले निश्चयासी ।
तया दर्शन स्पर्शने पुण्य जोडे ।
तया भाषेणे नष्ट संदेह मोडे।।133 ।।
नसे गर्व आंगी सदा वीतरागी ।
क्षमाशांतीभोगी दयादक्ष योगी ।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा।
इही लक्षणी जाणिजे योगिराणा ।।134 ।।
धरी रे मना संगती सज्जनाची ।
जेणे वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।
बळे भाव सद्बुध्दी सन्मार्ग लागे ।
महा क्रुर तो काळ विक्राळ भंग ।। 135 ।।
भये व्यपिले सर्व ब्रह्मांड आहे।
भयातीत ते संत आनंत पाहे ।
जया पाहतां द्वैत कांही दिसेना ।
भय मानसीं सर्वथा ही असेना ।। 136 ।।
जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेला ।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।
देहबुध्दीचे कर्म खोटे टळेना ।

जुनें ठेवणे मीपणे आकळेना ।। 137 ।।
भ्रमें नाडळे वित्त तें गुप्त जालें ।
जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आलें ।
देहेबुध्दिचा निश्चयो ज्या टळेना ।
जुने ठवणे मीपणे आकळेना ।। 138 ।।
पुढे पाहतां सर्व ही कोंदलेंसे ।
अभाग्यास हें दृश्य पाषण भासे ।
अभावें कदा पुण्य गांठी पडेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ।। 139 ।।
जयाचे तया चूकले प्राप्त नाही ।
गुणे गोविले जाहलें दुःख देही ।
गुणावेगळी वृति तेही वळेंना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ।। 140 ।।
म्हणे दास सायास त्याचे करावे ।
जनी जाणता पाय त्याचे धरावे ।
गुरूअंजनेवीण ते आकळेना ।
जुने ठेवणे मीपणे ते कळेना ।। 141 ।।
कळेना कळेना कळेना ढळेना ।
ढळे नाढळे संशयो ही ढळेना ।
गळेना गळेना अहंता गळेना ।
बळे आकळेना मिळेना मिळेना ।। 142 ।।
अविद्यागुणे मानवा ऊमजेना ।
भ्रमें चूकले होते ते आकळेना ।
परीक्षेविणा बांधले दृढ नाणें ।
परी सत्य मिथ्य असे कोण जाणे ।। 143 ।।
जगी पाहता साच ते काय आहे ।
अती आदरें सत्य शोधुनि पाहें ।
पुढे पाहता पाहता देव जोडे ।

भ्रम भ्रांति अज्ञान हे सर्व मोडे ।। 144 ।।

सदा वीषयो चिंतितां जीव जाला ।

अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।

विविके सदा स्वस्वरूपी भरावे ।

जीवा ऊगमी जन्म नाही स्वभावे ।।145 ।।

दिसे लोचनी ते नसे कल्पकोडी ।

अकस्मात आकारले काळ मोडी ।

पुढे सर्व जाईल कांही न राहे ।

मना संत आनंत शोधूनि पाहें ।। 146 ।।

फुटेना तुटेना चळेना ढळेना ।

सदा संचले मीपणे तें कळेना ।

तया येकरूपासि दुजे न साहे ।

मना संत आनंत शोधुनि पाहें ।। 147 ।।

निराकार आधार ब्रह्मादिकांचा ।

जया सांगता सीणली वेदवाचा ।

विवेक तदाकार होऊनि राहें ।

मना संत आनंत शोधुनि पाहें ।। 148 ।।

जगी पाहता चर्मचक्षी न लक्षे ।

जगी पाहता ज्ञानचक्षी न रक्षे ।

जगी पाहता पाहणे जात आहे ।

मना संत आनंत शोधुनि पाहें ।। 149 ।।

नसे पित ना श्वेत ना श्याम कांही ।

नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाही ।

म्हणे दास विश्वासता मुक्ती लाहे ।

मना संत आनंत शोधुनि पाहे ।। 150 ।।

खरे शोधिता शोधिता शोधताहे ।

मना बोधिता बोधिता बोधताहे ।

परी सर्व ही सज्जनाचेनि योगे ।

बरा निश्चयों पाविजे सानुरागे ।। 151 ।।
बहुतांपरी कूसरी तत्वझाड ।
परी अंतरी पाहिजे तो निवाडा ।
मना सार साचार ते वेगळे रे ।
समस्तांमध्ये येक ते आगळे रे ।। 152 ।।
नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें ।
समाधान कांही नव्हे तानमानें ।
नव्हे योगयोगें नव्हे भोगत्यागें ।
समाधान तें सज्जनाचेनि योगे ।।153 ।।
महावाक्य तत्वादिकें पंचिकर्णे ।
खुणे पाविजे संतसंगे विवर्णे ।
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो ।
तया सांडूनी चंद्रमा भाविजेतो ।।154 ।।
दिसेना जनी तेंचि शोधूनि पाहें ।
बरे पाहता गूज तेथेचि आहे।
करी घेऊं जाता कदा आडळेना ।
जनी सर्व कोंदाटलें तें कळेना ।।155 ।।
म्हणे जाणता तो जनी मूर्ख पाहे ।
अतर्कासि तर्की असा कोण आहे ।
जनी मीपणे पाहता पाहवेना ।
तया लक्षितां वेगळे राहवेना ।। 156 ।।
बहु शास्त्र धुंडाळितां वाड आहे ।
जया निश्चयो येक तोही न साहे ।
मती भांडती शास्त्रबोधे विरोधें ।
गती खुंटती ज्ञानबोधें **प्रबोधे** ।। 157 ।।
श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रे
स्मृती वेद वेदांत वाक्ये विचित्रें ।

स्वयें शेष मौनावला स्थीर राहे ।
मना सर्व जाणीव सांडून पाहे ।। 158 ।।
जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची ।
तया भोजनाची रूची प्राप्त कैंची ।
अहंभाव ज्या मानसीचाविरेना ।
तया ज्ञान हें अन्न पोही जिरेना ।। 159 ।।
नको रे मना वाद हा खेदकारी ।
नको रे मना भेद नानाविकारी ।
नको रे मना सीकवू पूढिलांसी ।
अहंभाव जो राहिला तूजपासी ।। 160 ।।
अहंतागुण सर्वही दुःख होते ।
मुखे बोलिलें ज्ञान ते व्यर्थ जातें ।
सुखी राहता सर्वही सुख आहे ।
अहंत तुझी तूंच शोधूनि पाहे ।। 161 ।।
अहंतगुणे नीती सांडी विवेकी ।
अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोंकी ।
परी अंतरी सर्व ही साक्ष येते ।
प्रमाणांतरे बुध्दि सांडूनि जाते ।। 162 ।।
देहेबुद्धीचा निश्चयो दृढ ज़ाला ।
देहेबुध्दिचा तें हीत सांडीत गेला ।
देहबुध्दी ते आत्मबुध्दि करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।। 163 ।।
मनें कल्पिला वीषयो सोडवावा ।
मनें देव निर्गूण तो बोळखावा ।
मनें कल्पितां कल्पना तें सरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।। 164 ।।
देहादीक प्रंपच हा चिंतियेला ।
परी अंतरी लोभ निश्चीत ठेला ।
हरीचिंतने मुक्तिकांत वरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।। 165 ।।
अहंकार विस्तारला या देहाचा ।
स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्याचा ।
बळे भ्रांति हे जन्मचिंता हरावी ।

सदा संगती सज्जनाची धरावी ।।166 ।।

बरा निश्चयो शाश्वताचा करावा ।

म्हणे दास संदेह तो वीसरावा ।

घडीनें घडी सार्थकाची करावी ।

सदा संगती सज्जनाची धरावी ।।167 ।।

करी वृत्ति जो संत तो संत जाणा ।

दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा ।

उपाधी देहेबुध्दितें वाढवीते ।

परी सज्जना केवि बांधु शके ते ।।168 ।।

नसे अंत आनंता संता पूसावा ।

अहंकारविस्तार हा नीरसावा ।

गुणेंविणा निर्गुण तो आठवावा।

देहेबुध्दिचा आठऊं नाठवावा ।। 169 ।।

देहेबुध्दि हे ज्ञानबोध त्यजावी ।

विवेकें तये वस्तुची भेटि घ्यावी ।

तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें ।

म्हणोनि सदा तेचिं शोधीत जावें ।। 170 ।।

असे सार साचार ते चोरलेसे ।

इही लोचनी पाहतां दृश्य भासे ।

निराभास निगुण तें आकळेना ।

अहंतागुणें कल्पितांही कळेना ।। 171 ।।

स्फुरे वीषयी कल्पना ते अविद्या ।

स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।

मुळी कल्पंना दोरूपें तेचि जाली ।

विवेके तरी स्वस्वरूपीं मिळाली ।। 172 ।।

स्वरूपी उदेला अहंकार राहो ।

तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो ।

दिशा पाहता ते निशा वाढताहे ।

विवेके विचारें विवंचूनि पाहे ।। 173 ।।
जया चक्षुने लक्षितां लक्षवेना ।
भवा भक्षितां रक्षितां रक्षवेनां । रक्षिता
क्षयातीत तो आक्षयी मोक्ष देतो ।
दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो ।। 17 ।।
विधी निर्मीता लीहीतो सर्व भाळी ।
परी लीहिता कोण त्याचे कपाळी ।
हरू जाळितो लोकसंहारकाळी ।
परी सेवटी शंकरा कोण जाळी ।। 175 ।।
जगी द्वादशादित्य हे रूद्र अक्रा ।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा ।
जगी देव धुंडाळित आढळेना ।
जगी मुख्य तो कोण कैसा कळेना । ।। 176 ।।
तुटेना फुटेना कदा देवराणा ।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ।
कळेना कळेना कदा लोचनासी ।
वसेना दिसेना जनी मीपणासी ।।177 ।।
जया मानला देव तो पूजिताहे ।
परी देव शोधूनि कोण्ही न पाहे ।
जगी पाहता देव कोटयानकोटी ।
जया मानली भक्ती जे तेचि मोठी ।। 179 ।।
तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले ।
तया देवरायासि कोण्ही न बोले ।
जगी थोरला देव तो चोरलासे ।
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ।। 179 ।।
गुरू पाहतां पाहतां लक्ष कोटी ।
बहुसाल मंत्रावली शक्ती मोठी ।
मनीं कामना चेटकें धातमाता ।
जनी व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ।। 180 ।।

नव्हे चेटकी चाळूकू द्रव्यभोंदू ।
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू ।
नव्हे उन्मतू वेसनि सगबाधू ।
जनी ज्ञानिया तेचि साधू अगाधू ।। 181 ।।
नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं ।
क्रियेविण वाचाळता तेचि मोठी ।
मुखे बोलिल्यासारिखे चालताहे ।
मना सद्गुरू तोचि शोधूनि पाहे ।। 182 ।।
जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ।
प्रभू दक्ष वित्पन्न चातुर्य जाणे ।
तयाचेन योगें समाधान बाणें ।। 183 ।।
नव्हे तेचि जालें नसे तेचि आलें ।
कळों लागलें सज्जना चेंनि बोलें ।
अनुर्वाच्य ते वाच्य वाचे वदावें ।
मना संत आनंत शोधीत जावे ।। 184 ।।
लपावें अती आदरें रामरुपी ।
भयातीत निश्चिंत ये स्वस्वरुपीं ।
कदा तो जनीं पाहताहीं दिसेना ।
सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ।। 185 ।।
सदा सर्वदा राम सन्नीध आहे ।
मना सज्जना सत्य शोधून पाहे ।
अखंडीत भेटी रघूराजयोगु ।
मना सांडि रे मीपणाचा वियोगु ।। 186 ।।
भुतें पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे ।
परी सर्व ही स्वस्वरुपीं न साहे ।
मना भासले सर्व काहीं पहावें ।

परी संग सोडूनि सूखी रहावें ।। 187 ।।

देहेभान हें ज्ञानशास्त्रें खुडावें ।

विदेहीपणें भक्तिमार्गेंचि जावें ।

विरक्तीबळें निंद्य सर्वें त्याजावें ।। 188 ।।
परी संग सोडूनि सूखं रहावें ।। 188 ।।
मही निर्मिली देव तो वोळखावा ।

जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा ।

तया निर्गुणालागि गूणीं पहावें ।

परी संग सोडूनि सूखें रहावें ।। 189 ।।

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता ।

परेहुन पर्ता न लिंपे विवती ।

तया निर्विकल्पासि कल्पीत जावें ।

परी संग सोडूनि सूखे रहावें ।। 190 ।।

देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना ।

तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना ।

परब्रह्म तें मीपणें आकलेना ।

मनीं शून्य अज्ञान हे मावळेना ।। 191 ।।

मना नाकळे नाढळे रुप ज्याचें ।

दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें ।

तया खूण ते हीण दृष्टांत पाहे ।

तेथे संग निस्संग दोनी न साहे ।। 192 ।।

नव्हे जाणता नेणता देवराणा ।

न ये वर्णितां वेदशास्त्रा पुराणा ।

नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा ।

श्रुती नेणती नेती अंत त्याचा ।। 193 ।।

वसे हृदई देव तो कोण कैसा ।

पुसे आदरें साधकू प्रश्न ऐसा ।

देहे टाकितां देव कोठे रहातो ।

परी मागुतां ठाव कोठे पहातो ।। 194 ।।
वसे हृदई देव तो जाण ऐसा ।
नभाचे परी व्यापूकू जाण तैसा ।
सदा संचल येत ना जात कांही ।
तयावीण कोठे रिता ठाव नाही ।।195 ।।
नभी वावरे जो अणुरेणु कांही ।
रिता ठाव या राघवीण नाही ।
तया पाहतां पाहतां तोचि जालें ।
तेथे लक्ष आलक्ष सर्व बुडाले ।। 196 ।।
नभासरिखे रूप या राघवाचे ।
मनी चिंतितां मुळ तूटे भवाचे ।
तया पाहतां देहबुध्दि उरेना ।
सदा सर्वादा आर्त पोटी पुरेना ।। 197 ।।
नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे ।
रघुनायका ऊपमा ते न साहे ।
दुजेविण जो तोचि तो हा स्वभावें ।
तथा व्यापकू व्यर्थ कैसे म्हणावे ।। 198 ।।
अती जीर्ण विस्तीर्ण ते रूप आहे ।
तेथे तर्क संपर्क तोही न साहे ।
अती गूढ ते दृढ तत्काळ सोपे ।
दुजेवीण जें खूण स्वामीप्रतापी ।। 199 ।।
कळे आकळे रूप ते ज्ञान होते ।
तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था ।
मना उन्मनी शब्द कुठत राहे ।
तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ।। 200 ।।
कदा बोळखीमाजी दुजे दिसेना ।
मनी मानसी द्वैत कांही वसेना ।

बहूता दिसा आपूली भेटि जाली ।

विदेहीपणे सर्व काया निवाली ।। 201 ।।

मना गूज रे तूज हें प्राप्त जाले ।

परी अंतरी पाहिजे यत्न केले ।

सदा श्रवणे पाविजे निश्चयासी ।

धरी सज्जन संगती धन्य होसी ।। 202 ।।

मना सर्व ही संग सोडूनि द्यावा ।

अती आदरे सज्जनाचा धरावा ।
जयाचेनि संगे महादुःख भंगे ।
जनी साधनेविणा सन्मार्ग लागे ।। 203 ।।

मना संग हा सर्व संगास तोडी ।

मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ।

मना संग हा साधका साघ्र सोडी ।

मना संग हा द्वैत निःशेष मोडी ।। 204 ।।

मनाची शतें ऐकता दोष जाती ।

मतीमंद ते साधना योग्य होती ।

चढे ज्ञानवैराग्य सामर्थ्य अंगी ।

म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी ।। 205 ।।

*****************

## ** परिशिष्ट दुसरे **

### मनोबोधातील कांही निवडक श्लोक

गणाधीस जो ईश सर्वा गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमू पंथ आनंत या राघवाचा ।। 1 ।।
मना सज्जना भक्तिपंथेचि जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वाभावें ।
जनीं निंद्य ते सर्व सोडूनि द्यावें ।
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे ।। 2 ।।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।
पुढे वैखरी राम आधी वदावा ।
सदाचार हा थोर सोडू नये तो ।
जनीं तेचि तो मानवी धन्य होतो ।। 3 ।।
मना वासना दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुध्दि नको रे ।
मना सर्वथा नीती सोडू नको हों ।
मना अंतरी सारवीचार राहो ।। 4 ।।
नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नानाविकारी ।
नको रे मना सर्वथा अंगिकारूं ।
नको रे मना मत्सरू दंभभारू ।। 6 ।।
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे ।
मना बोलणें नीच सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें ।
मना सर्व लोकांसि रे नीववावे ।। 7 ।।

।जनी सर्वसूखी असा कोण आहे ।
विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ।
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले।
तयासारखे भोगणे प्राप्त जालें ।। 11 ।।
सदासर्वदा देव सन्नीध आहे।
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।
सुखानंद आनंद कैवल्यादानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानि ।। 36 ।।
सदा देवकाजी झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा ।
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। 48 ।।
क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें ।
न लिप कदा दंभवादे विवदें ।
करी सुखसंवादे जो ऊगमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वेत्तमाचा ।। 52 ।।
अती मुढ त्या दृढ बुध्दी असेना ।
अती कामे त्या राम चिंत्ती वसेना ।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।
अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ।। 64 ।।
हरीकीर्तनें प्रीती रामी धरावी ।
देहबुध्दी नीरूपणीं वीसरावी ।
परद्रव्य आणिक कांता परावी ।
यदर्थी मना सांडि जीवी करावी ।। 103 ।।
विवेकी क्रिया आपूली पालटावी ।
अती आदरे शुध्द क्रीया धरावी ।
जनीं बोलण्यासारिखे चाल बापा ।
मना कल्पना सोडि संसारतापा ।। 105 ।।

फुकाचें मुखी बोलता काय वेंचे ।
दिसेंदिस अभ्यंतरी गर्व साचें ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारी तुझा तूंचि शांधून पाहें ।। 114 ।।
नसे गर्व अंगी सदा वीतरागी ।
क्षमाशांती भोगी दयादक्ष योगी ।
नसे लोभ ना मोक्ष ना दैन्यवाणा ।
इही लक्षणी जाणिजे योगिराणा ।। 134 ।।
जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।
परी जीव अज्ञान तैसेंचि ठेले ।
देहेबुध्दिचें कर्म खोटे टळेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ।। 137 ।।

म्हणे दास सायास त्याचे करावे ।
जनीं जाणता पाय त्याचे धरावें ।
गुरूअंजनेवीण तें आकळेना ।
जुने ठेवणें मीपणे तें कळेना ।। 141 ।।
निराधार आधार ब्रह्मदिकांचा ।
जया सांगता सीणली वेदवाचा ।
विवेकें तदाकार होऊनि राहें ।
मना संत आनंद शोधूनि पाहें ।। 148 ।।
मनें कल्पिला वीषयो सोडवावा ।
मनें देव निंर्गुण तो वोळखावा ।
मनें कल्पितां कल्पना ते सरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।। 164 ।।

नसे अंत आनंदा संतां पुसावा ।
अहंकारविस्तार हा नीरसावा ।
गुणेंविण निर्गुण तो आठवावा ।
देहेबुध्दिचा आठवो नाठवावा ।। 169 ।।
तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले ।
तया देवरायासि कोणी न बोले ।
जगीं थोरला देव तो चोरलासे ।
गुरूवीणा तो सर्वथाही न दीसे ।। 179 ।
लपावें अतीआदरे रामरूपीं ।
भयातीत निश्चंत ते स्वस्वरूपीं ।
कदा तो जनीं पाहतोही दिसेना ।
सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ।। 185 ।।
वसे हृदयी देव तो जाण ऐसा ।
नभाचेपरी व्यापूक जाण तैसा ।
सदा संचला येत ना जात कांही ।
तयावीणा कोठे रिता ठाव नाहीं ।। 195 ।।

*********************

## **परिशिष्ट तिसरे **

### मनोबोधांतील सुभाषितें

1. मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।
2. घडीनें घडी सार्थकाची करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।।
3. समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ? ।।
4. देह त्यागीतां कीर्ती मागे उरावी ।
5. देहदुःख ते सूख मानीत जावें ।
6. जनी सर्वसूखी असा कोण आहे ? ।
7. महाथोर ते मृत्युपंथेचि गेले
कितीयेक ते जन्मले आणि मेले ।।
8. मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढे जात आहे ।।
9. अकस्मात होणार होवोनि जातें ।
10. नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।
11. घरी कामधेनू पुढें ताक मागे ।
12. प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ।
13. विठोनें शिरीं वाहिली देवराणा ।
14. मुखी राम त्या काम बांधू शकेना ।
15. यथासांग रे कर्म तेंही घडेना ।
घडे कर्म तें पुण्य गांठी पडेना ।।
16. क्रियेवीणा वाचाळता व्यर्थ आहे ।
17. तुटे वाद संवाद तो हीतकारी ।
18. जनीं सांगतां ऐकता जन्म गेला ।
परी वादवेवाद तैसाचि ठेला ।।

19. फुकाचें मुखी बोलता काय वेंचे ।
दिसेंदिस अभ्यंतरी गर्व सांचे ।।

20. जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले । ।।

21. जिवा ऊगमी जन्म नाहीं स्वभावें ।

22. समाधान ते सज्जनाचेनि योंगे ।

23. अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा ।

24. देहेबुध्दि ते आत्मबुध्दि करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।।


**************

## ** परिशिष्ट चौथे **


### समर्थांची कुंडली

समर्थांची कुंडली शके 1850 साली श्री समर्थगाथा मुद्रण चालू असताना श्री. ज. स. उपाध्य तात्यासाहेब करंदीकर, पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन आणि कै. दत्तात्रय विष्णु आपटे या तिघां ज्योतिषशास्त्रवेत्या समर्थ भक्तांनी करून दिली .

जन्मलग्न कुंडली




राशि कुंडली




श्री शालिवाहन शके 1530 चैत्र. शु. 9 सोमवार सूर्योदयात् गत घटि 15 पळे 7 या समयी जांब येथे जन्म.

## ** परिशिष्ट पांचवे **

### समर्थांची वंशावळ.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | (मूळ पुरुष) कृष्णाजीपंत. | 12. | गुंडोपंत. |
| 2. | दशरथपंत. | 13. | निराजीपंत. |
| 3. | रामाजीपंत. | 14. | आत्मारामपंत. |
| 4. | हरिपंत. | 15. | शिवाजीपंत. |
| 5. | निराजीपंत (उर्फ निरांजन ) | 16. | विष्णूपंत. |
| 6. | शिवाजीपंत. | 17. | केशवपंत. |
| 7. | विष्णुपंत. | 18. | रामाजीपंत. |
| 8. | ब्राम्हणाजीपंत (उर्फ ब्रह्मजी) | 19. | भवानजीपंत. |
| 9. | गणेशपंत. | 20. | सूर्याजीपंत. |
| 10. | धोंडोपंत. | 21. | त्रिंबकपंत. |
| 11. | आत्मारामपंत (उर्फ अलक्षपंत) | 22. | सूर्याजीपंत. |

22. सूर्याजीपंत यांचे पुत्र:

- गंगाधर उर्फ श्रेष्ठ उर्फ रामीरामदास
- नारायण उर्फ समर्थ उर्फ रामदास.

'समर्थ चरित्र' – सदाशिव खंडो आळतेकर, प्रथमावृत्ती, पान नंबर 46–47.

# * परिशिष्ट – 6 वे *

## रामदासांची चरित्ररेखा.

| | |
|---|---|
| **रामदास –** | नारायण सूर्याजीपंत ठोसर. |
| इ. स. 1608– | जन्म जांब (जि. औरंगाबाद) येथे चैत्र शुद्ध नवमीस. |
| 1615 – | वडील सूर्याजीपंत यांचे निधन. |
| 1620 – | (हनुमंतस्वामीच्या बखरीनुसार) मारुतीच्या कृपेने रामचंद्राचे दर्शन. अनुग्रह व 'रामदास' हे नामकरण.<br>– मामा भानजीपंत वोधलापूर यांची मुलगी ही नियोजीत वधू. विवाहप्रसंगी घराचा त्याग.<br>– नाशिक पंचवटीस आगमन. जवळच टाकळीस वास्तव्य.<br>– गोदावरीतीरी तपश्चर्येस आरंभ – त्रयोदशाक्षरी रामजपाचा एक कोटीचा संकल्प. |
| 1620 – 32 | प्राचीन ग्रंथाचा अभ्यास, मनन, चिंतन – जपसमाप्ती. |
| 1632 – 43 | आसेतु – हिमाचल संचार. तीर्थयात्रा. काही शिष्यांचा यात्रेत लाभ ('समर्थ प्रताप या ग्रंथात शिष्यांची नांवे, गावे दिली आहेत.) |
| 1644 | महाबळेश्वरास.... तेथून वाईस, माहुलीस, जरंडयास, क–हाडास. डोंगरात, चाफळ खो–यात कृष्णातीरी वास्तव्य. |
| 1644 – 47 | मारुतीची स्थापना. |
| 1645 – | मसूर (जि. सातारा) येथे रामजन्माचा पहिला उत्सव. |
| 1648 – | चाफळास राममंदीराची बांधणी.व रामजन्मोत्सव. |
| 1649 – | चाफळजवळ शिंगणवाडीस शिवाजीराजांची भेट. |
| 1654 – 64 | रायगडाजवळील शिवथर घळीत 'दासबोधा' चे लेखन. |
| 1655 – | जांबेस आई राणूबाई यांचे निधन. |
| 1657 – | प्रतापगडावर शिवाजीराजांकडून तुळजाभवानीची प्रतिष्ठापना रामदासांची 'भवानी स्तोत्र' रचना. |
| 1658 – | चाफळच्या रामजन्मोत्सवास शिवाजीराजांकडून वर्षासन. |
| 1659 – | अफझलखानच्या वधसमयीचे 'उत्तम पुरुष' निरुपण (द.18, स.6) |
| 1672 – | 'निश्चयाचा महामेरु' ही शिवाजीराजांच्या गुणवर्णनाची रचना. |

– चैत्रात रामजन्मोत्सवात कोल्हापूर जवळील पारगाव मठात शिवाजीराजांची भेट.

1673 – चैत्रात रामजन्मोत्सवात कोल्हापुर जवळ पारगाव मठात शिवाजीराजांकडून इनाम. प्रत्येक गावांतील फक्त 11 विघ्यांचे उत्पन्न मठासाठी ठेवून उरलेले राज्य – खजिन्यात जमा करण्याचा रामदासांचा आदेश.

1674 – शिवाजीराज्याभिषेकप्रसंगी रामदास प्रतापगडावर. नंतर शिवाजीराजांचे कुटुंबियांसमवेत रामदासांच्या सहवासात सज्जनगडावर वास्तव्य.

1678 – शिवाजीराजांकडून चाफळ मठास सनद.

1680 – चैत्र पौर्णिमेस शिवाजीराजांचे निधन.

माघत संभाजीराजांस राज्यभिषक.

अखंड सावधान' हा संभाजीराजांना उपदेश.

1682 तंजावराहून आणवलेल्या राम – सीता – लक्ष्मण हनुमान यांच्या मूर्तींची माघ वद्य सज्जनगडावर स्थापना नंतर चार दिवसांनी म्हणजे माघ वद्य नवमीस रामदासांचे निधन – शनिवार, 22 जानेवारी 1682. (सेतूमाधवराव पगडी यांच्या लेखानुसार 'वसंत'दिवाळी अंक – 1981 )

'रामदास. प्रतिमा आणि प्रबोधन' त्र्यं. वि. सरदेशमुख, प्रथमावृति, अस्मित प्रकाशन, पुणे, पान नंबर 147.

*******************